# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र. रानिआ/मनपा २०२०/प्र.क्र.७ /का ५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू
चौक, मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७ मार्च, २०२०.

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी

विषय: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोटनिवडणुका-२०२० करोना विषाणू - कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून निवडणुकीशी संबंधित कामकाज आहे त्या टप्प्यावर स्थगित करण्याबाबत...

संदर्भ: मुख्य सचिव ,महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. ग्रापंनि २०२०/प्र.क्र. १६/पंरा २ दि. १७/३/२०२०. (सोबत प्रत जोडली आहे)

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्रान्वये शासनाने राज्यात करोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याबाबत विनंती केली आहे.

२. मा. मुंबई उच्च न्यायालयातील रिट याचिका क्रमांक-५२३४/२००५ मध्ये दिनांक १०/८/२००५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार नैसर्गिक आपत्ती अथवा एखादी आकस्मिक परिस्थिती उद्भवल्यास निवडणुका पुढे ढकलण्याबाबत राज्य निवडणूक आयोगास अधिकार आहेत.

३. सध्या महानगरपालिका (नवी मुंबई, औरंगाबाद व वसई विरार), ९ नगर परिषदा / नगर पंचायती व १० पोटनिवडणूका, जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत असलेल्या पंचायत समित्या (भंडारा

व गोंदीया) आणि १५७० ग्रामपंचायतीचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम व सुमारे १२०१५ ग्रामपंचायतीचा प्रभाग रचना कार्यक्रम सध्या सुरू आहेत.

४. याबाबत सध्याच्या करोना विषाणू (कोव्हिड-१९) मुळे उदभवलेल्या गंभीर परिस्थितीचा विचार करता, अशावेळी निवडणूका घेणे उचित होणार नाही. या निवडणूका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याच्या दृष्टीकोनातून राज्य निवडणूक आयोग, सध्या सुरू असलेले सर्व कार्यक्रम स्थगित करीत आहे. उपरोक्त सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे कामकाज (प्रभाग रचना, मतदार यादी व प्रत्यक्ष निवडणूक) **आज दिनांक १७ मार्च, २०२० रोजी ज्या टप्प्यावर असतील त्याच टप्प्यावर पुढिल आदेशापर्यंत स्थगित करण्यात येत आहे**. परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर योग्य वेळी वरील निवडणूक कार्यक्रम पुन्हा सुरू करणेबाबत यथोचित आदेश नंतर जारी केले जातील.

मा .राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१) मुख्य सचिव ,महाराष्ट्र शासन ,मंत्रालय ,मुंबई-: ४०० ०३२.
२) अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई ४०००0१.
३) प्रधान सचिव, नगर विकास विभाग ,मंत्रालय ,मुंबई-: ४०० ०३२.

33

क्र.ग्रापंनि -२०२०/प्र.क्र.१६/पंरा-२
**ग्रामविकास विभाग**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक : १७ मार्च, २०२०.

महाराष्ट्र शासन

**अजोय मेहता**
**मुख्य सचिव**

**विषय:-राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रस्तावित सार्वत्रिक निवडणूका कोव्हीड-१९ च्या संक्रमणामुळे उद्भवलेल्या आपतकालीन परिस्थितीमुळे पुढे ढकलण्याबाबत.**

आदरणीय महोदय,

जागतिक आरोग्य संघटनेने "जगभर पसरलेला साथीचा रोग ( Pandemic)" म्हणून घोषित केलेला कोव्हीड-१९ (कोरोना विषाणु) देशात तसेच महाराष्ट्रातही संक्रमित होत असल्याने राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यात कोराना विषाणुमुळे उद्भवणाऱ्या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्यविषयक आपत्कालीन परिस्थिती नमूद करुन, दि.१३.०३.२०२० च्या अधिसूचनेन्वये साथरोग अधिनियम-१८९७ च्या खंड २, ३ व ४ ची अंमलबजावणी राज्यात सुरू केली आहे. तसेच, दि.१४.०३.२०२० च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२० निर्गमित केला आहे. त्याद्वारे, आयुक्त/संचालक आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त हे या साथरोगाच्या नियत्रंण उपायोजनेसाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहेत.

त्वरीत सादर करावे.
17/3.

२. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.१४.०३.२०२० च्या पत्रान्वये राज्यामध्ये या साथरोगाचे संक्रमण वाढु नये यासाठी मोठ्या प्रमाणात प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू झाल्या असून, नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी शॉपिंग मॉल्स, मल्टीप्लेक्स थिएटर, जलतरण तलाव, उद्याने, नाट्यगृहे अशी सार्वजनिक ठिकाणे दि.३१.०३.२०२० पर्यंत बंद ठेवण्यात आली आहेत. तसेच, सर्व सार्वजनिक सभा/संमेलने/मेळावे/सांस्कृतिक कार्यक्रम बंद ठेवण्यात आले आहेत.

३. राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या आगामी ३ महिन्यातील प्रस्तावित सार्वत्रिक निवडणूकांसाठी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, निवडणूक यंत्रणेवरचा ताण, वोटींग मशिनचा सामुदायिक वापर, प्रचारासाठी होणारी गर्दी, सभा व मेळावे तसेच, पदयात्रा अशा माध्यमांतून सार्वजनिक ठिकाणी अनेक लोक एकत्र येण्याची शक्यता आहे. उपरोक्तप्रमाणे आरोग्यविषयक आपत्कालीन परिस्थिती विचारात घेता, सदरच्या सर्व बाबी टाळणे अत्यंत आवश्यक आहे.

..२/-

४. सबब, कोराना विषाणुमुळे उद्भवणाऱ्या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्यविषयक आपत्कालीन परिस्थिती, साथरोग अधिनियम-१८९७ ची सुरू झालेली अंमलबजावणी व राज्यात सदर साथरोगाचा प्रार्दुभाव / संक्रमण प्राधान्याने रोखण्याची आवश्यकता व राज्यातील प्रस्तावित निवडणूकांमुळे वाढणारी तीव्र जोखीम या पार्श्वभूमीवर आगामी ३ महिन्यांमध्ये राज्य निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येणा-या महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत आणि ग्रामपंचायत या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रस्तावित असणाऱ्या निवडणूका ३ महिन्यांसाठी पुढे ढकलण्यात याव्यात व पुढील ३ महिने कोणत्याही निवडणूका न घेण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात याव्यात, ही विनंती.

आपला स्नेहांकित,

Ajoy Mehta

(अजोय मेहता)

**श्री. यु.पी.एस. मदान**
मा. मुख्य निवडणूक आयुक्त
राज्य निवडणुक आयोग
पहिला मजला, नवीन प्रशासन भवन,
मुंबई ४०० ०३२.